मा. अति. महापालिका आयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका
ठराव क्र.:- १/ ९९६
दिनांक :- 24/05/2023.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र. :- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था-४/ ९७७९
दिनांक :- २४ /०५ /२०२३.

**-: आज्ञापत्र :-**

**विषय :-** पुणे महानगरपालिका समाज विकास विभागाकडील “सहाय्यक समाज विकास अधिकारी(श्रेणी-३)”, वेतन मेट्रिक्स एस-१४ : ३८६००-१२२८००+ (मान्य भत्ते) या पदावर तात्पुरत्या पदोन्नतीने नियुक्ती देणेबाबत.

**संदर्भ :-** १) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/३७, दि.१५/०५/२०२३.
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/९९६ , दि. 24/05/2023.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील समाज विकास विभागाकडील “समाज सेवक,श्रेणी-३” या निम्न पदावरून “सहाय्यक समाज विकास अधिकारी(श्रेणी-३)”, वेतन मेट्रिक्स एस-१४ : ३८६००-१२२८०० + (मान्य भत्ते) या पदावर तात्पुरत्या पदोन्नतीने नेमणुक करणेस संदर्भ क्र. १ व २ चे ठरावाने प्राप्त मान्यतेस अनुसरून खालील कर्मचाऱ्यांची या आज्ञापत्राच्या दिनांकापासून तात्पुरत्या पदोन्नतीने नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सेवकाचे नाव | नेमणुकीचा गट | सध्याचे पदनाम | नियुक्तीचे पदनाम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र तुकाराम मोरे, (खुला ) | सेवा ज्येष्ठतेने | समाजसेवक, श्रेणी-३ | सहाय्यक समाज विकास अधिकारी, श्रेणी-३ | रिक्त जागी |
| २ | श्रीमती पूजा विनोद पवार, (इ.मा.व.) | सेवा ज्येष्ठतेने | समाजसेवक, श्रेणी-३ | सहाय्यक समाज विकास अधिकारी, श्रेणी-३ | रिक्त जागी |
| ३ | श्री. रामदास दत्तात्रय धावडे, (भ.ज.क.) | सेवा ज्येष्ठतेने | समाजसेवक, श्रेणी-३ | सहाय्यक समाज विकास अधिकारी, श्रेणी-३ | रिक्त जागी |

१) उपरोक्त तात्पुरती पदोन्नती ही महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१ चे अधिन राहून करण्यात येत आहे.

२) उपरोक्त अधिकाऱ्यांची सहाय्यक समाज विकास अधिकारी, श्रेणी-३ या पदावरील तात्पुरती पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधिन असून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(अ) सदर कर्मचा-यांविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचा-यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) मागास प्रवर्गातील कर्मचा-यांची पदोन्नती सदर कर्मचा-यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबधित जात पडताळणी समितीने निर्गमित केले आहे या अटीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

३) वरील नियुक्त्या मे. राज्य शासनाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिका डायरी क्र. ३३१५१/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालय पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत जो काही निर्णय देईल त्यानुसार मागास प्रवर्गातील अधिकारी यांच्या पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

४) वरील सेवकांनी आज्ञापत्र हाच कार्यमुक्ती आदेश समजून पदोन्नतीच्या पदावर त्वरीत रुजू होऊन त्याप्रमाणे रुजू अहवाल या विभागास सादर करावा. वरील सेवक आज्ञापत्राच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत पदोन्नतीचे पदावर रुजू न झालेस सदरची पदोन्नती रद्द होईल, याची नोंद घ्यावी.

५) निवड झालेल्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्याबाबत अवलंबण्याची कार्यवाही याविषयीचे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२ दि.१२/०९/२०१६ मधील तरतुदीनुसार पुढील उचित कार्यवाही करणेत येईल.

६) संबंधित सेवकास महानगरपालिका सेवाविनियमानुसार वेतन व मान्य भत्ते आदा करणेत यावेत. तसेच उपरोक्त सेवकांना मनपा सेवाविनियम व वेळोवेळी शासन पारित करेल ते शासन निर्णय लागू होतील.

७) सदर आज्ञापत्रकाची नोंद उपरोक्त सेवकांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील कार्यवाही करावी.

Raut

(रविंद्र बिनवडे)

**अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)**
**पुणे महानगरपालिका**

24/5/2023

प्रत : सर्व संबधित खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका

यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना--